


कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून स्थानकांच्या कामांनी वेग घेतला आहे.

# ७५.१ टक्के काम पूर्ण, भुयारीकरण ९९ टक्के

## विविध प्रकारच्या चाचण्या आहेत सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ प्रकल्पाचे काम ७५.१ टक्के पूर्ण झाले असून, आता स्थानकांची कामे वेगाने सुरू असल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे करण्यात आला आहे. दुसरीकडे मेट्रो ३ ची सीप्झ (सरिपुतनगर) येथील रॅम्प ते मरोळ नाका दरम्यान सुमारे ३ किमी अंतरावरील डाऊन मार्गावर डिझाइन सिद्ध करणारी ट्रेनची चाचणी सुरू आहे. ड्रायव्हिंग प्रकार चाचणी, एअरकंप्रेसर चाचणी, ब्रेक चाचणी, दरवाजे चाचणी, वातानुकूलित यंत्रणेची चाचणी या चाचण्यांचा यात समावेश आहे.

मुंबई मेट्रो ३ ही मुंबईची महत्त्वाची लाईफ लाईन बनणार आहे. या मेट्रो प्रकल्पाचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण होईल. मेट्रोमुळे रस्त्यावरील खासगी वाहतूक कमी होणार आहे. त्यामुळे सुमारे २.३० लाख टन कार्बन उत्सर्जन कमी होईल. जी झाडे तोडावी लागली, त्यांनी जितके कार्बन शोषून घेतले असते. मेट्रोमुळे केवळ ८० दिवसांत तेवढे कमी उत्सर्जन होईल.

### काम टक्क्यांत

सिव्हिल वर्क ८६.५

सिव्हिल स्टेशन ८५.४

भुयारी काम ९९

ओव्हर ऑल सिस्टीम ४०.४

ट्रॅकचे काम ३८

### कोणत्या स्थानकाचे काम किती झाले?

कफ परेड ९३.३ टक्के , विधान भवन ९२.१, चर्चगेट ९१.१, हुतात्मा चौक ८६.५, सीएसएमटी ८७.४ , काळबादेवी ६०.५, गिरगाव ४६.८, ग्रँटरोड ७२.२, मुंबई सेंट्रल ८३.४, महालक्ष्मी ८१.९, सायन्स म्युझियम ८३.६ , आचार्य अत्रे चौक ७६.१, वरळी ८१.५, सिद्धिविनायक ९२.९, दादर ८५.९ , शीतलादेवी ८५.१, धारावी ८६.९, बीकेसी ८३.३, विद्यानगरी ८५.८, सांताक्रूझ ८४, आंतरराष्ट्रीय, विमानतळ ८७.४, सहार रोड ८७.५, राष्ट्रीय विमानतळ ८७.८ , मरोळ नाका ९१.५, एमआयडीसी ९४.३, सीप्झ ९४.१.